# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/03/2024 (मंगळवार) सकाळ


### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०४/०३/२०२४ रोजी २२.०० वा. दरम्यान पो. स्टे. भिवापूर हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना नीलज फाटा ते भिवापूर रोडने १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-49/AT-2387 हा येतांना दिसला त्याचा पाठलाग करून समर्थ पेट्रोल पंप समोर थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीतांकडुन टिप्पर ट्रक क्र. MH-49/AT-2387 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामध्ये ०५ ब्रास रेती किंमती २५,०००/—रू. असा एकूण २५,२५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर टिप्पर **चालक नामे— लालचंद सोनबा नखाते, वय २३ वर्ष, रा. पाथरी ता. पवनी जि. भंडारा व मालक नामे— दिनेश सावरबांधे, रा. आसगाव** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पी.एस.आय. सदमेक, परी. पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, पोलीस अंमलदार मिलिंद राठोड, रवी वानखेडे, पोलीस अंमलदार निकेश आरिकर यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर